# फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

पंजि. कार्यालय :- एफडीसीएम भवन, ३५९-बी, हिंगणा रोड, अंबाझरी, नागपूर - ४४००३६

ईमेल: md@fdcm.nic.in, gm.hq@fdcm.nic.in,

CIN:U45200MH1974SGCO17206


## कंत्राटी पध्दतीवर नेमणुकीची जाहिरात

फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि./वन विभागामधुन सेवानिवृत्त झालेले विभागीय व्यवस्थापक/ विभागीय वन अधिकारी, सहाय्यक व्यवस्थापक/ सहाय्यक वनसंरक्षक, उच्च/ निम्न श्रेणी लघुलेखक आणि एफडीसीएम लिमि. मधून सेवानिवृत्त झालेले वेतन व लेखाधिकारी, सहाय्यक वेतन व लेखा अधिकारी, लेखापाल व लेखा सहाय्यक यांची एफडीसीएम लिमिटेडच्या विविध कार्यालयात विवक्षित सेवा/ कामाकरीता करार पध्दतीने विहित अटी व शर्तीवर १२ महिने कालावधीकरीता नेमणुक करावयाची असल्यामुळे अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी/ कर्मचाऱ्यांनी वैयक्तिक तपशील दर्शविणारे प्रपत्रातील अर्ज वरील पत्त्यावर दिनांक २४ जूलै, २०१८ रोजी सायंकाळी ५.४५ पर्यत प्राप्त होईल अशा रितीने पाठवावेत. इच्छुक अधिकारी त्यांच्या अर्जाची एक प्रत ई-मेलद्वारे सुध्दा पाठवु शकतात, परंतु अर्जाची छापील प्रत विहित मुदतीत व वेळेत या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | विषयनिहाय नामिकायन (Empanelment) | खालील प्रकारच्या विवक्षित कामासाठी पात्र अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून अर्ज मागवून नियुक्तीसाठी मूलाखतीद्वारे नामिकासूची तयार करण्यात येईल व आवश्यकतेप्रमाणे करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येईल.<br>१. टर्न-की रोपवने<br>२. योजना व योजनेत्तर कामे<br>३. वन व वानिकी कामे<br>४. आस्थापना विषयक कामे<br>५. लेखा विषयक कामे<br>६. अंकेक्षण विषयक कामे |
| २ | पात्र सेवानिवृत्त अधिकारी | एफडीसीएम लिमि. / वन विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी/ कर्मचारी -<br>१. विभागीय व्यवस्थापक/ विभागीय वन अधिकारी<br>२. सहाय्यक व्यवस्थापक/सहा.वनसंरक्षक,<br>३. उच्च /निम्न श्रेणी लघुलेखक<br>एफडीसीएम लिमि. मधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी -<br>१. वेतन व लेखा अधिकारी,<br>२. सहाय्यक वेतन व लेखा अधिकारी,<br>३. लेखापाल<br>४. लेखा सहाय्यक |
| ३ | वय | दिनांक ०१.०७.२०१८ रोजी ६७ वर्षापेक्षा अधिक नसावे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | नियुक्तिची कालमर्यादा | करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी देण्यात येईल. नियुक्तिचे आवश्यकतेनूसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करण्यात येईल. मात्र एकूण कालावधी ३ वर्षापेक्षा अधिक असणार नाही. |
| ५ | अहर्ता व अनुभव | १. संबधित पदाचे कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>२. करार पध्दतीने नियुक्तीसाठी इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा.<br>३. सेवानिवृत्त अधिकारी यांचे विरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांना कोणतीही शिक्षा झालेली नसावी. |
| ६ | मासिक पारिश्रमिक व भत्ते | **१) मासिक पारिश्रमिक :** शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७.१२.२०१६ मधील २.(ड)-१)(क), (ख) व २) नूसार निश्चित करण्यात येईल. परंतू, मासिक पारिश्रमिकाची अधिकत्तम राशी रुपये ५०,०००/- पर्यंत मर्यादीत राहिल.<br>**२) प्रवास भत्ता व दैनिक भत्ता** : कामाचे स्वरुपानुसार आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता देय राहील. मात्र त्यासाठी नियंत्रण अधिकाऱ्याची परवानगी घेणे आवश्यक राहील. |
| ७ | इतर अटी व शर्ती | १. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधितास शासनाच्या/वन विकास महामंडळाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क राहणार नाही.<br>२. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेला अधिकारी, त्यांना सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.<br>३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याने गुंतलेले हितसंबध (conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.<br>४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याने त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/ माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.<br>५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत त्यांचे नियंत्रक अधिकारी वेळोवेळी आढावा |

| | | |
|---|---|---|
| | | घेवुन कामाचे मुल्यमापन करतील.<br>६. आवश्यकतेनूसार कार्यालयीन कामकाजाचे वेळेशिवाय तसेच एखाद्या निकडीचे प्रकरणी बोलावल्यावरुन शासकीय सुट्टीचे दिवशी हजर राहणे बंधनकारक राहील.<br>७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार राहणार नाही.<br>८. करार पद्धतीवरील नेमणूकीसाठी रुपये १०,०००/- (रुपये दहा हजार) अनामत रक्कम म्हणून एफडीसीएम लिमिटेडकडे जमा करावे लागेल.<br>९. करार पध्दतीने नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांना बंधपत्र/ करारनामा करणे बंधनकारक राहील.<br>१०. करार पद्धतीवरील नेमणूक एफडीसीएम लि. च्या कोणत्याही प्रदेशात/ विभागात/ कार्यक्षेत्रात करण्यांत येईल.<br>११. मुलाखतीकरीता येणा-यांना प्रवासखर्च देय राहणार नाही.<br>१२. करार पध्दतीवरील सेवा कोणत्याही वेळी समाप्त करण्याचे अधिकार नियंत्रण अधिकाऱ्यांना राहतील.<br>१३. करार पद्धतीवरील नियुक्तीच्या नियमनासंबंधीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे राखुन ठेवले आहेत |

व्यवस्थापकीय संचालक

**फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लि. मध्ये कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करण्यासाठी अर्जदारांचा संपूर्ण वैयक्तिक तपशिल दर्शविणारा प्रपत्र**

| अ.क्र | तपशील | |
|---|---|---|
| १ | संपुर्ण नाव | |
| २ | पत्रव्यवहाराचा पत्ता | |
| ३ | दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | जन्म तारीख | |
| ५ | दिनांक ०१.०७.२०१८ रोजीचे वय | वर्ष महिने दिवस |
| ६ | प्रथम नियुक्तीचे पद व सेवेत रुजु दिनांक | |
| ७ | एफडीसीएम/वन विभाग | |
| ८ | शैक्षणिक पात्रता व अहर्ता | |
| ९ | सेवानिवृत्तीचे पद व सेवानिवृत्तीचा दिनांक | |
| १० | सेवानिवृत्तीच्या दिनांकास असलेले मूळ वेतन आणि ग्रेड वेतन | |
| ११ | अर्ज केलेल्या पदावरील कामाचा अनुभव | कालावधी- वर्ष- महिने- दिवस- |
| १२ | विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित आहे किंवा कसे तसेच विभागीय चौकशी /फौजदारी गुन्हा प्रकरणी शिक्षा झालेली आहे/ नाही, असल्यास शिक्षेचे स्वरूप व कालावधी | |
| १४ | करार पध्दतीने नियुक्तीच्या अटी व शर्ती मान्य आहे किंवा कसे | |
| १५ | इतर माहिती- वेगवेगळया पदावरील कामाचा अनुभव/ व इतर अर्हता असल्यास | |
| १६ | करार पद्धतीवरील नियुक्तीकरीता पसंतीच्या तीन ठिकाणांची नावे | |

स्वाक्षरी :

नाव